चंद्रपूर व नागपूर जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात प्रकाशयोजनेसाठी एल.ई.डी.पथदिवे राबविण्याबाबतच्या पथदर्शी तत्त्वावरील प्रकल्पास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता, वित्तीय मान्यता देण्याबाबत व निधी वितरीत करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१७/प्र क्र २९६/ऊर्जा-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ मार्च, २०१८

<u>वाचा :</u> १.शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१५/ प्र क्र ३७८/ऊर्जा-७, दिनांक २२ जून, २०१७
२.महाऊर्जा कार्यालयाचे पत्र क्रमांक : ईसीएन/२०१७-१८/सी आर-४१/२८२९, दिनांक ५/७/२०१७
३.शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१७/प्र क्र २९६/ऊर्जा-७, दिनांक ७ जुलै,२०१७

<u>प्रस्तावना :</u>

ऊर्जेचा वापर कार्यक्षमतेने करण्यासाठी, ऊर्जेचा वापर करतांना ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर करणे, त्यायोगे ऊर्जा बचतीस प्रोत्साहन देणे याकरिता राज्यात संदर्भित क्र.१ नमूद शासन निर्णय दिनांक २२ जून,२०१७ अन्वये राज्याचे “ऊर्जा संवर्धन धोरण-२०१७” जाहिर करण्यात आले आहे. सदर ऊर्जा संवर्धन धोरण,२०१७ च्या तरतुदींनुसार राज्यातील सर्व नगरपालिका / महानगरपालिका / विकास प्राधिकरणे/ ग्रामपंचायत/ महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ/ जिल्हा परिषद/ सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच सर्व शासकीय / निमशासकीय विभाग यांना पथदिवे बसवितांना केवळ एलईडी पथदिवे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन, संदर्भित क्र.३ नमूद शासन निर्णय दिनांक ७ जुलै,२०१७ अन्वये, चंद्रपूर व नागपूर जिल्हया अंतर्गत येणाऱ्या अनुक्रमे २६ व २९ गावांच्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात प्रकाश योजनेसाठी एलईडी पथदिवे राबविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे, सदरच्या प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन नियोजन व वित्त विभागाद्वारे कार्योत्तर मंजूरी देण्याची, सदर पथदर्शी प्रकल्पास वित्तीय मान्यता देण्याची आणि निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २६ गावे तसेच नागपूर जिल्ह्यातील एकूण २९ गावांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात ऊर्जा संवर्धनाच्या दष्टीने एल.ई.डी. पथदिवे बसविणे व इतर अनुषंगिक बाबींकरिता संदर्भाधीन क्र.३ येथील नमूद शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प आता पथदर्शी स्वरुपात राबविण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. सदर पथदर्शी प्रकल्पास या शासन निर्णयान्वये नियोजन व वित्त विभागाची मान्यता देण्यात येत असून, खालील अटीं व शर्तीवर वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार, सदर कार्यक्रमाकरिता रु.३५.०० कोटी (रुपये पस्तीस कोटी फक्त)

इतका निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना वितरीत करण्यासाठी शासन मंजूरी देण्यात येत आहे :-

१.महाऊर्जाद्वारे सदर पथदर्शी प्रकल्प एकाच निविदेद्वारे राबविण्यात येईल. सदय:स्थितीत ऊर्जा संवर्धनाकरिताचा दर पहाता, पथदर्शी प्रकल्प रु.३५ कोटीपर्यंत सिमित करुन निविदा काढण्यात यावी. वित्त विभागाद्वारे देण्यात आलेल्या निधीमधून निविदेतून येणारी रक्कम व महाऊर्जाचा व्यवस्थापन खर्च वजा होता उर्वरित रक्कम महाऊर्जाद्वारे शासनास परत करण्यात यावी.

२.सदर पथदर्शी प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती संबंधित निविदाकारांकडून करण्यात येईल. सदर पथदर्शी प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीचा कालावधी (Maintenance) किमान ५ वर्षे राहिल अशी अट निविदेत समाविष्ट करण्यात यावी.

३.महाऊर्जाद्वारे पथदर्शी प्रकल्प राबवण्यापूर्वी प्रथम प्रदेय (Deliverables) निश्चित करण्यात येतील. सदर पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यावर या प्रदेय (Deliverables) च्या अनुषंगाने निष्कर्ष व फलनिष्पत्ती तपासून ते शासनास सादर करणे बंधनकारक राहिल. सदर पथदर्शी प्रकल्पाचे निष्कर्ष व फलनिष्पत्ती विचारात घेऊन राज्यात राबविण्यात येणाऱ्या यासंदर्भातील योजनेकरिता विचारात घेण्यात येतील. याची नोंद पथदर्शी प्रकल्पाचे प्रदेय (Deliverables) ची निश्चिती करण्यात यावी.

४.महाऊर्जाद्वारे ५५ गावांमध्ये पथदिव्यांकरिता होणाऱ्या सदय:स्थितीत होणाऱ्या वीजेच्या वापराच्या (Electricity Consumption) मर्यादेत, पथदर्शी प्रकल्पामधून होणाऱ्या ऊर्जेचा वापर (Consumption) मर्यादित ठेवण्यात करावा. त्यामुळे सदर गावांच्या पथदिव्याकरिता होणाऱ्या वीजेच्या वापरात (Electricity Consumption) वाढ होणार नाही याची दक्षता घेऊनच प्रकल्प राबविण्यात यावा.

५.प्रकल्प राबविण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीना अवगत करुन नियमोचित मंजूरी घ्यावी.

६.प्रकल्प राबविताना एनर्जी एफिशिएन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (E.E.S.L.) या केंद्रीय संस्थांचा सल्ला घ्यावा, जेणेकरुन पथदर्शी प्रकल्पाची उत्कृष्ट अंमलबजावणी होऊ शकेल.

२. सदर रक्कम रु.३५.०० कोटी (रुपये पस्तीस कोटी फक्त) अदा करण्यासाठी श्री.अ.मा.आत्राम, सह सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री.वि.म. राजूरकर, अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर रक्कम रु.३५.०० कोटी (रुपये पस्तीस कोटी फक्त) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावी.

४. सदर योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत सहाय्यक संचालक (लेखा),महाऊर्जा यांनी सादर करणे बंधनकारक राहिल.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम केवळ महाऊर्जाने विचाराधीन पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठीच खर्च करण्यात येईल याची खातरजमा महाऊर्जाकडून करण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा. तसेच या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालावधीत व विहित नमुन्यात सादर करण्याची दक्षता घ्यावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सहाय्यक संचालक (लेखा), महाऊर्जा यांची राहिल.

६. महाऊर्जास सदर अनुदान लेख्यासंबंधीची कागदपत्रे, आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांच्याकडे आवश्यक तेव्हा तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहिल.

७. याबाबतचा खर्च “मागणी क्रमांक के-६, २८१०, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, ६०, इतर, ८०० इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजना, (००) (०१), महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (२८१० ००३४), ३१ सहायक अनुदाने वेतनेतर” या लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.”

८. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३३१/१४६१, दि.१६/१२/२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५/१८/व्यय-१६, दि.१०/१/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या त्या-त्या विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

९. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संगणक संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११२११५५५०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2018.03.21 12:13:43 +05'30'

(प्र.पु.बडगेरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
२.प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
३.प्रधान सचिव (ऊर्जा), उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
४.जिल्हाधिकारी, नागपूर,
५.जिल्हाधिकारी, चंद्रपूर,
६. मा.मंत्री (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांचे खाजगी सचिव,
७.मा.राज्यमंत्री (नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांचे खाजगी सचिव,
८.महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,

१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई,
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
१२.अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई,
१३.महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे-४११ ००६,
१४.प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक,
१५.सह सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक,
१६.उप सचिव (ऊर्जा-३) यांचे स्वीय सहाय्यक,
१७.निवड नस्ती (ऊर्जा-७)